PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhaloo
Year: 1980

Song: Alyad navri palyad
Lyricist: P Sawalaram

अल्याड नवरी पल्याड नवरा
आंतरपाट ह्यो मधी धरा
अल्याड नवरी पल्याड नवरा
आंतरपाट ह्यो मधी धरा
अन् अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा
ह्या अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा

अबलख घोडा सोन्याचा तोडा
झळकतो पुढच्या पायात
डोई मुंडवळ्या वराची स्वारी
बेंडबाजा सनई वाजत

नवरा आला मंडप दारी
ठुमकत आली करवली
घाली पाणी पायावरी
ओवाळून तुकडा टाकीत
नवरी आली लाजत बाई
मंगलाष्टका सुरू करा
अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा
ह्या ह्या अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा

नाकी नथनी गळ्यात गळसरी
हिरवा चुडा तो करी
नवरी ती हसरी लाजूनी बघे
दृष्टी तिची भुईवरी

लिंबू टोचून शस्त्र धरून उभा
पाठीस मी राहतो
जवळी उभी करवली
बाय ना तिजकडे
चोरून मी पाहतो
शुभमंगल सावधान

आलाय रूखवत रूखवत
उघडायचा कोणी
आवं नवरा रूसलाय रूसलाय
रूसल्या विहीणी
संसार दिला अंगठी दिली

पॉम पॉम मोटार आणायची कुठली रं
घ्या बाई घ्या नाव तुम्ही घ्या
आहा नाय बाई
अहो घ्या हो
म्हसोबाचं नाव घ्यायला
लाज मला वाटते
अरे म्हसोबाचं नाव घ्यायला
लाज मला वाटते
साखर वाटून बोटं मी चाटते

वाजत गाजत वरात चालली
दारू भुसनळा उडवीत
सासरी चालली ताई आमुची
पाणी भरलंय डोळ्यात
सासरी चालली ताई आमुची
पाणी भरलंय डोळ्यात

Literacy for a Billion

अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा
ह्या अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा
ह्या ह्या अक्काताईचं लगीन ठरलंय
मुहूर्त पहिला चला धरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*